**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव.**
आस्थापना विभाग
**ठोक मानधन तत्वावर**
**(फक्त सहा महिन्याचा विशिष्ट कालावधी करीता)**
**मानधन पद भरती करीता**
**सविस्तर जाहीर सुचना**

मालेगाव महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील कामांचा त्वरेने निपटारा होणे कामी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात **फक्त सहा महिन्याच्या विशिष्ट कालावधी करीता** खालील तक्त्यात नमुद पदे थेट मुलाखती (walk in interview) पध्दतीने निव्वळ **ठोक मानधन तत्वावर** भरणे कामी शैक्षणिक पात्राताधारक इच्छुक उमेदवारांनी खालील तक्त्यात नमुद प्रमाणे विशिष्ट दिनांक, वेळ व स्थळ येथे उपस्थित रहावे.

| अ. क्रं. | पद | पद संख्या | पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता | मानधन प्रति माह रुपये | मुलाखती चा दिनांक, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | फायरमन / अग्निशमन विमोचक (Fireman Rescuer) (ठोक मानधन तत्वावर, फक्त सहा महिन्या करीता) | ५० | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एस.एस.सी) उत्तीर्ण.<br>ब) राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन,मंबई यांचा ०६ महिने कालावधीचा अग्निशामक पाठ्यक्रम पुर्ण.<br>क) शारीरिक पात्रता :<br>१)उंची - किमान १६५ से.मी. (महिला उमेदवारींची उंची किमान १६२ से.मी.)<br>२) छाती - ८१ से.मी. फुगवुन ५ से.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागु नाही)<br>३) वजन - ५० किलो<br>४) दृष्टी - चांगली | रुपये १४०००/- चौदा हजार रुपये | दि. २२/०२/२०२३ सकाळी ११:०० ते दु.२:०० स्थळ: अग्निशमन केंद्र, जाखोट्या भवन, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समोर, मालेगाव. |

**टिप :-**

१) **सदरची पदे कमाल निव्वळ ६ महिने कालावधीकरीता ठोक मानधन स्वरुपाची असल्याने मुदत संपातच ठोक मानधन तत्वावरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल या बाबातीत कोणतेही स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येणार नाही.**

२) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द/स्थागित करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, मानधन कमी वा जास्त करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे व इतर सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार तसेच मानधन कमी किंवा जास्त करण्याचा अधिकार मा.आयुक्त मनपा,मालेगाव यांनी राखुन ठेवला आहे.

३) उमेदवारांची निवड करतांना किमान शैक्षणिक पात्रता जाहिर सुचनामधील नमुद रकाना ४ प्रमाणे असणे आवश्यक राहील.तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये व कोव्हीड-१९ च्या काळात प्रत्यक्ष काम केलेल्या अनुभवी व स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

४) म.शासनाचे धोरणानुसार ई.पी.एफ. रक्कम देय मानधनातुन कपात करण्यात येईल.

५) निवड झालेले उमेदवारांचे ठोक मानधन तत्वावरील नियुक्ती कालावधीत कामकाज समाधानकारक नसल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता उमेदवाराची मानधन नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यत येईल.



Scanned by CamScanner

६) उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची छानणी अंती फक्त पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.अपात्र उमेदवारांचा मुलाखतीसाठी विचार केला जाणार नाही.

७) मुलाखतीसाठी प्रवास भत्ता व इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

**८) सदरची पदे ही विशिष्ट कालावधी करीता व ठोक मानधन तत्वावर फक्त कामांचा निपटारा करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपाचा असल्याने सदर पदांचा कायमपणाचे कोणतेही फायदे अनुज्ञेय रहाणार नाहीत व त्यावर दावा करता येणार नाही, याची काळजीपुर्वक नोंद घ्यावी.**

९) सर्व साधारण उमेदवार यांचे करीता वयोमर्यादा १८ ते ३८ वर्ष व मागासवर्गीयांसाठी १८ ते ४३ वर्ष अशी राहील तथापी महापालिका सेवेत कोव्हीड-१९ व इतर काळात सेवा देणाऱ्या पात्र उमेदवारांना कमाल वयाची अट लागु राहणार नाही.

१०) प्रस्तुत मानधन भरती प्रक्रिया ही पारदर्शक होणार असल्याने या संदर्भात कोणत्याही गैरप्रकाराला बळी पडु नये.

११) सदर मानधन भरती प्रक्रिया अंतर्गत होणाऱ्या नियुक्ती मिळणे कामी कोणताही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबाव आणल्याचे निंदर्शनास आल्यास परिणामस्वरुप संबंधित उमेदवारास भरती प्रक्रियातुन बाद करण्यात येईल, याची गांभीर्यपुर्वक नोंद घ्यावी.

**इच्छुक उमेदवारांनी कोऱ्या कागदावर खालील माहीती व कागदपत्रासह हजर रहावे.**

**अ)** पदाचे नाव **ब)** उमेदवाराचा संपुर्ण नाव **क)** पत्ता, भ्रमणध्वणी क्रमांक, फोन नं. ईमेल आयडी (भ्रमणध्वणी क्रंमाक देणे अनिवार्य राहील) **ड)** जन्म तारीख (शाळा सोडल्याचा दाखला/जन्माचा दाखला/एस.एस.सी.रेकॅार्ड वरुन) ची नोंदीनुसार **इ)** शैक्षणिक पात्रता, उत्तीर्ण वर्ष प्राप्त गुणाची टक्केवारी गुणपत्रिका **फ)** शासकिय व निमशासकीय विभागात कामाचा अनुभव दाखला **ग)** एस.एस.सी.गुणपत्रिका, एच.एस.सी गुणपत्रिका, पदासाठी शैक्षणिक पात्रता असल्यास उत्तीर्ण वर्षाची गुणपत्रिका व प्रमाणपत्र, उच्च शैक्षणिक आर्हता धारक असल्यास त्याची गुणपत्रिका, व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रत जोडुन पासपोर्ट साईजच्या फोटोसह उपस्थित रहावे.

**आयुक्त**
**मालेगाव महानगरपालिका,मालेगाव**

Scanned by CamScanner